# पूर्व विदर्भाची श्रीमंत सांस्कृतिक चळवळ झाडीपट्टी रंगभूमी

**मृद्‌गंध**



सदानंद बोरकर

उत्तरार्ध

**झाडीपट्टीची** प्राचीन रंगभूमी आणि आजची रंगभूमी यात मात्र आमूलाग्र बदल पाहायला मिळतो. आजच्या रंगभूमीचं स्वरूप व्यावसायिक झालं आहे. झाडीपट्टीतील मध्यवर्ती ठिकाण असलेले वडसा देसाईगंज हे शहर म्हणजे या रंगभूमीचं व्यावसायिक केंद्र बनलेलं आहे. पूर्वीच्या काळात हौसेपोटी जन्माला आलेली नाट्यमंडळे जवळपास इतिहासजमा झालेली आहेत. याच कलाकारांनी आता एकत्र येऊन वडसा येथे आपापल्या नाट्यसंस्था उभारल्या आहेत. पुणे, मुंबई,



औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर इत्यादी शहरांतील नामवंत कलाकारांना पाहुणे कलावंत म्हणून आपल्या नाट्यसंस्थेत बोलवायचं आणि सादरीकरण करायचं, अशी परंपरा काही वर्षांपासून जोरात सुरू झाली आहे. आपली नाट्यसंस्था नावारूपाला आणण्यासाठी नट किंवा नटीला भरमसाट मानधन देऊन आपल्याकडे ओढण्याची कसरतसुद्धा इथे पाहायला मिळते. एकट्या वडसा शहरात या स्पर्धेतूनच पन्नासाहून अधिक नाट्यसंस्था कार्यरत झाल्या आहेत. त्या नाट्यसंस्था झाडीपट्टीतील गावागावांत जाऊन लोकांचं मनोरंजन आणि प्रबोधन करीत आहेत.

दिवाळीनंतर लगेचच झाडीपट्टीत मंडई (जत्रा) आणि शंकरपटाचे (बैलांची शर्यत) वारे वाहायला लागतात. त्यानिमित्त सुरुवात झालेली नाट्यचळवळ मार्च महिन्यापर्यंत सुरू असते. वडसास्थित एकेक नाट्यसंस्था त्यांच्या लोकप्रियतेनुसार प्रत्येक सीझनमध्ये कुणी दीडशे, कुणी शंभर, कुणी पन्नास नाटके सादर करते.

वडसा शहरात शंभर-दोनशे किलोमीटर अंतरावरून खेड्यापाड्यातील आयोजक मंडळी नाटके ठरवण्यासाठी येतात. जीवनावश्यक वस्तूंच्या दुकानांसमोर जशी ग्राहकांची गर्दी असते, तशीच गर्दी येथील नाट्यसंस्थेच्या बुकिंग ऑफिससमोर त्या सीझनमध्ये पाहायला मिळते. या शहरातील मुख्य रस्त्यावर या काळात नाटकाच्या मोठमोठ्या होर्डिंग्जची गर्दी लक्ष वेधून घेते. खेड्यातील लोकांसाठी वडसा येथे नाटक म्हणजे संजीवनी असते. एकाच ताटात शाकाहारी, मांसाहारी, गोड, कडू, मसालेदार पदार्थ एकत्र यावेत आणि त्याचा जो संमिश्र रसास्वाद निर्माण व्हावा, तो स्वाद झाडीपट्टीची नाटके बघताना होतो.

झाडीपट्टी नाटकांचं नेपथ्य म्हणजे केवळ वरून सोडलेले पडदे. प्रसंगानुरूप पडदे बदलण्याची प्रथा पूर्वीपासून चालत आलेली आहे. वीस-बावीस फूट रुंदीच्या रंगमंचाच्या बरोबर मध्ये एकच पॉवरफूल माइक लावला जातो. त्यामुळे प्रत्येक पात्राची माइकजवळ जाऊन बोलण्याची चढाओढ लक्षात येण्याइतपत असते. त्यामुळेच झाडीपट्टीचा कलावंत प्रत्येक वाक्य 'हायपीच'मध्ये बोलतो. येथील प्रेक्षकांच्या कानालाही आता त्याच पट्टीची सवय झालेली आहे. नकळत का होईना; पण हिंदी सिनेमाचा प्रभाव येथील लिखाणावर आणि सादरीकरणावर स्पष्ट पाहावयास मिळतो. गरज असो वा नसो येथील कुठलेही नाटक लावणीशिवाय पूर्ण होत नाही. त्याशिवाय प्रत्येक अंकानंतर रेकॉर्डिंग डान्स करण्याची प्रथा येथे रूढ झालेली आहे.

झाडीपट्टीच्या नाटकाला आता पाच अंक असतात असं म्हटलं तर आश्चर्य वाटेल; पण ते सत्य आहे. नाटक सुरू होण्यापूर्वी मनोरंजन म्हणून नृत्याचा कार्यक्रम असतोच. त्याला 'हंगामा' असं नाव आहे. किमान दोन-अडीच तास हंगामा चालतो. त्यानंतर नाटकाच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम सुरू होतो. तो किमान एक ते दीड तास चालतो आणि त्यानंतर प्रत्यक्ष नाटक सुरू होतं. या रंगभूमीच्या माध्यमातून हजारो लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे, हे मात्र खरं. चार-पाच महिने तोंडाला रंग फासून नाटकात काम करणाऱ्या नट-नट्यांना आणि 'बॅक स्टेज' आर्टिस्टला झाडीपट्टीत मिळणारे मानधन वर्षभर सन्मानानं जगण्यासाठी आधार देते. एका कलावंताला एका प्रयोगाचे दोन हजारांपासून ते दहा हजारापर्यंतचे मानधन देणाऱ्या झाडीपट्टीत म्हणूनच पुण्या-मुंबईकडचे कलावंतसुद्धा चार-पाच महिने मुक्कामानं असतात. झाडीपट्टीच्या या पाच महिन्यांच्या सीझनवर अनेक कलावंतांचा संसार चालतो. पेंडॉलवाले, ट्रॅव्हल्सवाले, बॅकस्टेज सांभाळणारे, तबलजी, हार्मोनियम व सिंथेसायझर वादक, लायटिंग करणारे, रंगभूषा व वेशभूषाकार, जाहिरातदार, चहा व पान टपरीवाले, थिएटर बाहेर खाण्याचे दुकान लावून बसलेले विक्रेते, जुगारवाले या सर्वांचाच धंदा पाच महिने जोरात असतो. बहुतांश नाट्यप्रयोग 'हाऊसफुल्ल' असल्याचं चित्र इथे नेहमी पाहावयास मिळते. एकेका प्रयोगाला लाख-दोन लाखांची तिकीट विक्री होणं, हे आता नियमित झालं आहे. नाटक आवडलं तर 'वन्समोअर' म्हणून वाटेल तेवढा पैसा नट-नट्यांवर बक्षीस म्हणून उधळणारा प्रेक्षक याच भूमीत आहे, तर आवडता कलाकारच प्रयोगाला पोहोचला नाही म्हणून पेंडॉल जाळेपर्यंत क्रोध व्यक्त करणारा प्रेक्षकही याच भूमीत आहे. झाडीपट्टीतील कलावंतांमध्ये कलागुण ठासून भरले आहेत, यात शंकाच नाही. दिवसभर नोकरी करून रात्री शंभर-शंभर किलोमीटर अंतर प्रवास करून रात्रभर नाटक करून सकाळी पुन्हा नोकरीवर हजर होणारे, नॉनस्टॉप शंभर-दीडशे प्रयोग करणारे, पाठांतर नसतानाही वेळेवर प्रॉम्प्टिंगच्या भरवशावर हजारो प्रेक्षकांच्या समोर बेमालूम अभिनय करणारे फक्त झाडीपट्टीतच असू असतात, हे येथील नाटक बघितल्यानंतर सहज लक्षात येते.

*(लेखक-चित्रकार, नाट्यकलावंत, नाट्यलेखक, दिग्दर्शक, नेपथ्यकार म्हणून परिचित आहेत.)* **मो. : ९०२१३३३६३३**